पुढारी

# शिवाजी विद्यापीठातर्फे ५४३ अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ परीक्षा विभागाकडून आजअखेर सुमारे ५४३ विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत. परीक्षा विभागाकडून सोमवारी एम.एस्सी., मॅनेजमेंट, एम.फार्मा आदी अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आले. अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी दिली.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठ आजी-माजी विद्यार्थ्यांतर्फे ७३ बाटल्या रक्त संकलन

**कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) :** शिवाजी विद्यापीठातील आजी-माजी विद्यार्थी-विद्यार्थिनींनी एकत्र येऊन दीपावलीनिमित्त विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात उत्स्फूर्तपणे रक्तदान केले. विद्यार्थ्यांनी ७३ बाटल्या रक्तसंकलन केले. यामध्ये विद्यार्थांनी रक्तदाता व सीपीआर यांच्यामधील दुवा बनण्याचे काम केले. यावेळी सुनील दळवी, प्रदीप बोभाटे, राम चव्हाण, दत्तात्रय कदम, विनायक रेडेकर, मतीन शेख आदी उपस्थित होते.